संपादकीय

# पतसंस्थांचे सभासदत्व

सभासदाला कर्ज द्यावे, किंवा सभासदालाच पतसंस्थेकडे कर्ज मागण्याचा अधिकार आहे. त्यासाठी सभासद कोणाला करुन घ्यावे याचीही उपविधि व कायद्यामध्ये तरतुद आहे. पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील पात्र व्यक्तींना ठरलेले प्रवेश शुल्क व किमान एका भागाची रक्कम स्विकारुन संचालक मंडळाच्या सभेत मंजुरी देवून अग्रहक्क येणारा सभासद क्रमांक आरक्षित करून सभासदत्व देण्याची तरतुद आहे. आणि अशा सभासदाला पतसंस्थेकडून कर्ज मागण्याचा अधिकार आहे.

पतसंस्थेचा सभासद हा पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातलाच पाहिजे. आणि अशा सभासदालाच पतसंस्थेकडून कर्ज मागणे, ठेवी ठेवणे व पतसंस्थेच्या कारभारात सभासद म्हणून हक्क बजावणे इत्यादी अधिकार कायद्याने प्रदान केलेले आहेत.जी व्यक्ती करार करण्यास पात्र आहे व ज्या व्यक्तीचे मानसिक संतुलन व्यवस्थित आहे व ज्या व्यक्तीला करार करण्यास कुठल्याही अधिनियमाद्वारे बंदी घातली नसेल, अशा व्यक्तीला पतसंस्थेचे सभासद होता येते. कायद्याच्या कलम २४ मध्ये नाममात्र सदस्य किंवा हेत्याशी सभासद सदस्य व सहयोगी सभासद म्हणून पतसंस्थेचे सभासद होता येते. कलम २७(८) नुसार सहयोगी सदस्य सोडून इतर सभासदांना मतदानाचे अधिकार नसतात. पतसंस्थेच्या उपविधीत तरतुद केलेले अधिकार अशा सभासदांना मिळतात. कलम २ (१९) तरतुदीनुसार पतसंस्थेच्या नोंदणीसाठी केलेल्या अर्जावर सही असलेली व पतसंस्थेची नोंदणी फी दिल्यावर तिचा सभासद झालेली व्यक्ती यांना पतसंस्थेचे सभासद होता येते. कलम २२ मधील तरतुदीनुसार पतसंस्थेची नोंदणी झाल्यानंतर तिचे सभासद होणाऱ्या व्यक्तींनाही हे निकष लागू आहेत.

सभासद होणे किंवा बनविणे संदर्भात एखादा इसम दुसऱ्या सहकारी संस्थेचा सभासद असेल तर त्या **पतसंस्थेच्या उपविधी अन्वये** पतसंस्था त्या इसमाला आपला सभासद बनवुन घेण्यास नकार देवू शकते. पतसंस्थेच्या संचालक मंडळाने एखाद्या इसमाचा अर्ज सदस्य म्हणून स्विकारला पाहिजे. त्याने सदस्यत्वाची फी भरली व रजिस्टरमध्ये नावाची नोंद केली म्हणजे तो त्या पतसंस्थेचा सदस्य झाला असे म्हणता येणार नाही.

**पतसंस्थेच्या उपविधीमध्ये फर्म किंवा कंपनी यांना पतसंस्थेचे सभासद करून घेण्यास प्रतिबंध केला नसेल तर त्यांना पतसंस्थेचे सभासद बनविता येवू शकते.** पतसंस्थेची नोंदणी झाल्यानंतरच नोंदणीपूर्व संभाव्य सदस्य म्हणून ज्यांना सदस्य बनविले त्यांना कायदेशीर स्थान प्राप्त होते. शिवाय एकत्र कुटुंब हे पतसंस्थेचे सभासद होवु शकते. तसेच **पतसंस्थेचे संचालकांचे नातेवाईक त्या पतसंस्थेचे सभासद होवू शकतात.**

**पतसंस्थेला एखाद्या इसमाचे सदस्यत्व नाकारण्याचा अधिकार आहे. परंतू ते सदस्यत्व नाकारण्याचे कारण उपविधी व कायद्यानुसार निर्णय घेतल्यापासून १५ दिवसाचे आत किंवा सदस्यत्वासाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत संबंधित इसमास लेखी कळविले पाहिजे.** अन्यथा त्या इसमास सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात आले असे समजले जाते. सदस्यत्वाचा अर्ज संस्थेकडे पडून राहिला तर निबंधकाला त्या पतसंस्थेला त्या इसमास सदस्यत्व द्यावे असा आदेश देण्याचा अधिकार कायद्यामध्ये नाही. परंतू नविन दुरूस्ती अन्वये एखादी व्यक्ती सदस्य झाली आहे किंवा नाही याबद्दलच्या निर्णयाचा अधिकार निबंधकाला देण्यात आला आहे. **पतसंस्थेच्या कोणत्याही सदस्यास संचालक पदावरून काढण्याचा अधिकार निबंधकाला नाही. कलम ३५ अन्वये सांगितलेल्या पध्दतीप्रमाणे निबंधक एखाद्या सदस्याला काढू शकतो.**

सहकारामध्ये सदस्यत्व खुले असण्याची तरतूद आहे. कोणत्याही पतसंस्थेला पुरेशा कारणावाचुन कलम २३ व संस्थेच्या उपविधी यांच्या तरतुदीअन्वये यथोचितरित्या अर्हता असलेल्या कोणत्याही इसमास सदस्य म्हणुन दाखल करुन घेण्यास नकार देता येणार नाही. एखाद्या पात्र व्यक्तीने तीला सदस्य म्हणून दाखल करून घेण्यासाठी केलेला अर्ज किंवा तीने सदस्याच्या संदर्भात भरलेली रक्कम स्विकारण्यास नकार दिला असेल, त्याबाबतीत अशा व्यक्तीला विहित नमुन्यात सदस्यत्वा संदर्भात निबंधकाकडे अर्ज करता येईल आणि निबंधक तो अर्ज व दिलेली रक्काम मिळालेल्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत संबंधित संस्थेकडे पाठविल. आणि ती पतसंस्था असा अर्ज व रक्कम मिळालेच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत पतसंस्थेने अर्जदाराला कोणताही निर्णय कळविला नाही तर तो अर्जदार त्या पतसंस्थेचा सभासद झाला असे मानन्यात येईल.

सदस्य म्हणून दाखल करुन घेणास नकार देण्याच्या पतसंस्थेच्या निर्णयामुळे व्यथीत झालेल्या इसमास निबंधकाकडे अपील करता येईल. परंतु ३ महिन्याच्या कालावधिच्या आत असे अपील निकालात काढले नाही तर निबंधक विलंबाचे कारणे नमूद करतील. निबंधकाने अपीलावर दिलेला निर्णय अंतिम राहील. आणि त्याने अपला निर्णय अशा निर्णय तारखेपासून १५ दिवसाचे आत त्या संबंधित इसमास कळविला पाहिजे.

**खुले सभासदत्व याचा अर्थ असा नव्हे कि, कोणत्याही इसमास सभासदत्व मिळु शकेल.** परंतु अधिनियम, नियम व पतसंस्थेचा उपविधी यातील अटी पूर्ण करणाऱ्या इसमास योग्य त्या कारणास्तव सभासदत्व नाकारता येणार नाही. **सभासदत्वासाठी लेखी अर्ज केला पाहिजे.** व **त्या अर्जास संचालक मंडळाची मान्यतेशिवाय सभासदत्व मिळत नाही.** सभासद करुन घेताना कलम २९ मध्ये सांगितल्याप्रमाणे तसेच नियम व उपविधित निश्चित करण्यात आलेल्या अटी सभासद होवू इच्छिणाऱ्याने पुर्ण करणे आवश्यक आहे. कलम २३ प्रमाणे कोणत्याही पतसंस्थेला पुरेशा कारणा शिवाय योग्य अर्हता असलेल्या व्यक्तीला सभासदत्वासाठी प्रवेश नाकारू शकत नाही. आणि नकार देण्यात आला तर निबंधकाकडे अपील करण्याची तरतुद आहे. **अशी तरतुद असुनही काही पतसंस्था सदस्यत्वाचे अर्ज व सदस्य फी हेच मुळी नाकारण्याचे अवलंबवितात.** व त्यामुळे ते प्रकरण या कलमाच्या तरतुदी खाली येत नाही. पतसंस्थेच्या या प्रवृत्तींला आला घालण्याच्या उद्देशाने कलम २३ मध्ये सुधारणा करुन पोटकलम (१ - अ) नवीन दाखल केले आहे. त्यामुळे नाराज इसमाला आपला अर्ज व सदस्यत्वाची फी निबंधकाकडे एकत्र पाठविणे शक्य होईल व मिळालेला अर्ज व फी संस्थेकडे पाठविला व असा अर्ज मिळाल्यापासून ६० दिवसाचे आत पतसंस्था कोणताही निर्णय घेवू शकली नाही, तर अशा अर्जदाराला पतसंस्थेचा सभासद करुन घेण्यात आले असे समजण्यात येईल.

**अधिनियमाच्या तरतुदीविरुध्द पतसंस्थेचा उपविधी कुठल्याही परिस्थितीत असता कामा नये.** कोणतीही व्यक्ती, कोणत्या जाती किंवा धर्माची आहे ही गोष्ट सदस्यत्वाच्या आड येत नाही. व एखाद्या पतसंस्थेच्या उपविधीमध्ये जात, धर्म किंवा अन्य बाबींचा समावेश करून घेतला असेल तर ही बाब कलम ४,९,२२ आणि २३ या कायद्याच्या अधिनियमातिल विरुध्द आहे. एवढेच नव्हे तर अशा अटी असणे हे बेकायदेशिर आहे. अशा अटी उपविधिमध्ये घालणे म्हणजे सहकारावर बंधन घालणे. कायदा मंडळाने / घटनेने कोणत्याही व्यक्तीला जाती - धर्म - लिंग - जन्म ठिकाण अशा अटी घालण्याची परवानगी देवू नये हे अभिप्रेत आहे. संविधानाच्या अनुषेद २१ अन्वये जसे कोणत्याही व्यक्तीला गृहनिर्माण सहकारी संस्थेचा सभासद होण्याचा अधिकार दिला आहे. निबंधकाकडे करावयाच्या अर्जाचा नमुना निश्चित करण्याचे अधिकार या पोटकलमान्वये निबंधकाला देण्यात आलेले आहेत.

एखाद्या इसमास पतसंस्थेने सभासदत्व दिले असेल तर त्या सदस्यत्वाला कोणी आव्हान केल्यास त्याबद्दल

लवाद नेमून त्याचे सदस्यत्व योग्य ते अयोग्य कि ठरविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. कलम १५४ अन्वये शासनाला असलेल्या विशेष अधिकारांना निबंधकाने दिलेल्या अंतिम निर्णयामुळे धक्का पोहचत नाही हे बघण्याचे बंधन आहे. तसेच कलम १५४ अन्वये शासन हे निबंधकाच्या निर्णयामध्ये फेराफार करु शकते. कलम २३ (३) अन्वये दिलेला अंतीम निर्णय हा शासनाच्या कलम १५४ अन्वये असलेल्या अधिकारास रोखु शकत नाही.

खुले सभासदत्वाचा अर्ज पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या व पतसंस्थेला मिळालेल्या अधिकाराशी निगडीत आहे. **अर्जदार केवळ गरीब आहे, दुसऱ्या गटाचा आहे, दुसऱ्या जातीचा आहे अशी कारणे सभासदत्व नाकारण्यास पुरेशी नाहीत.** संचालक मंडळाची मर्जी म्हणुन सभासदत्व नाकारण्यात आले तर अर्जदार निबंधकाकडे अपील करून न्याय मिळवू शकतो. एखाद्या सदस्याला पतसंस्थेचा सदस्य म्हणून घेण्याबाबत निबंधकाचा या कलमाखाली दिलेला आदेश अनिवार्य असतो. आणि तो आदेश मानणे पतसंस्थेची जबाबदारी आहे.

एखाद्या पतसंस्थेने सभासदत्वासाठी दिलेला अर्ज नामंजूर करण्यात आला असेल किंवा त्या अर्जावर विशिष्ठ कालावधीत विचार केला नसेल तर ती व्यक्ती कलम २३ अन्वये अपील दाखल करू शकते. हे अपील सहाय्यक निबंधक / उपनिबंधकांकडे करायचे असते. परंतु कनिष्ठ न्यायालयाकडे यासंबंधी दावा निर्णयासाठी पडून आहे आणि अर्जदाराचा याबाबतचा न्याय सहकारी न्यायाधिकरण करीत असेल, अशा परिस्थितीत निबंधकाने कलम २० अन्वये आदेश जाहीर करून अर्जदार संस्थेचा सदस्य आहे असे जाहीर करणे हे कायद्याच्या विरूध्द आहे. या कलमा खालील तरतुदी अन्वये सहाय्यक निबंधकाने आपल्या अधिकाराचा गैरवापर केला असे स्पष्ट होते.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की, पतसंस्थेंचा सदस्य हे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० च्या कलम २२,२३,२४ प्रमाणे प्रामुख्याने संदर्भित येतात. आणि नियम १९, १९(अ), च्या प्रमुख तरतुदीशी संबंधित येतात. तसेच पतसस्थेचे सदस्य होण्यासाठी किंवा करण्यासाठी सहकार कायद्यातील अनेक कलमांचा व नियमांचा आधार घ्यावा लागतो. ते पोटकलम १ (अ), कलम ११, कलम २७ (८) इत्यादी कलमांचा अंतर्भाव सुध्दा लागू होतो. याप्रमाणे पतसंस्थांचे सभादस्यत्व मिळणेसाठी ज्या - ज्या गोष्टी करणे कायद्यानुसार आवश्यक आहेत त्या सर्व गोष्टीचा उहोपोह केलेला आहे. प्रत्येक पात्र इसम, पतसंस्था व निबंधक यांचे असेलेले अधिकार व त्यांचेवर टाकलेली कायद्याने बंधने,याचे थोडक्यात विश्लेषण या अग्रलेखात इतर सहकारी संस्थांप्रमाणे लागू असलेल्या तरतुदी अन्वये पतसंस्थांसाठी वरीलप्रमाणे स्पष्टपणे निर्दशनास आणून देण्यात येत आहे...

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!